महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १९१ वा | दिनांक : १८/०५/२०२५ | वार : रविवार

## छगन भुजबळांच्या पीएकडे मागितली १ कोटीची खंडणी





**नाशिक :** माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना एक कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला. यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मी इन्कम टॅक्स अधिकारी असल्याचे सांगत त्र्यंबकेश्वर येथे फार्महाऊसवर आयकर विभागाचा छापा पडणार आहे. तुम्हाला मदत हवी असल्यास १ कोटी रुपये द्यावे लागतील, असे म्हणत आरोपीने खंडणी मागितली होती. या प्रकरणी नाशिक पोलिसांनी सापळा रचून संबंधित आरोपीला अटक केली आहे. राहुल भुसारे असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, छगन भुजबळ यांचे खासगी सहाय्यक संतोष गायकवाड यांना आरोपीने अनोळखी क्रमांकावरून संपर्क साधला. या फोनवर आरोपीने स्वतःला आयकर विभागाचा अधिकारी असल्याचे भासवले. त्र्यंबकेश्वर येथील भुजबळ यांच्या फार्महाऊसवर लवकरच छापा टाकण्यात येणार आहे. मात्र, आपण त्या पथकाचा भाग आहोत असे सांगत, मदत करण्यासाठी एक कोटी रुपयांची मागणी केली. तसेच पैसे दिले नाही, तर कारवाईची धमकी दिली होती.

या फोन कॉलनंतर छगन भुजबळ यांच्या कार्यालयात एकच खळबळ उडाली. भुजबळ यांचे स्वीय सहायक संतोष गायकवाड यांनी पोलिसांत धाव घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी गंभीरतेने या प्रकरणाची दखल घेत, तपास सुरू केला. काही तासांतच कॉल कुठून आला याचा मागोवा घेत आरोपीचा शोध लावण्यात आला.

पोलिसांनी एक सापळा रचत आरोपीला अटक केली. विशेष बाब म्हणजे आरोपीने मूळ कॉल गुजरातमधील धरमपूर येथून केला होता. मात्र, खंडणीची रक्कम घेण्यासाठी तो नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील करंजाळी गावात येणार असल्याची माहिती पोलिसांनी मिळवली. त्यानुसार योजना आखून पोलिसांनी करंजाळी गावात सापळा रचला आणि आरोपी राहुल भुसारे याला रंगेहाथ अटक केली. आरोपीचे २४ एप्रिल ते १६ मे या दरम्यान संतोष गायकवाड यांना फोन कॉल सुरू होते.

सद्यःस्थितीत नाशिक पोलिस त्याची चौकशी करत असून, या प्रकरणामागे कुणाचा अजून हात आहे का, याचा तपास सुरू आहे.

छगन भुजबळ यांच्यावर अशा प्रकारे खंडणीसाठी दबाव टाकण्याचा प्रकार नवा असला तरी, पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि सापळा रचून केलेली अटक ही कौतुकास्पद मानली जात आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, आरोपीकडून अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आरोपी राहुल भुसारे हा बीएस्सी झालेला असून पेठ तालुक्यातील करंजाळी येथील रहिवासी आहे. सध्या तो बेरोजगार आहे. झटपट पैसे कमवायच्या उद्देशाने त्याने हे कृत्य केले आहे. छगन भुजबळांच्या पीएला सर्वप्रथम २३ एप्रिल रोजी फोन आला. त्यानंतर २ मे रोजी त्याने फोन केला आणि ४ दिवसांपासून त्याचे फोनवर बोलणे चालू होते. परंतु, आरोपीचे आणि छगन भुजबळ यांचे बोलणे झाले नाही. सर्व चर्चा ही त्यांचे पीए संतोष गायकवाड आणि आरोपी यांच्यात सुरू होती. आरोपी हा फोन करण्यासाठी स्वतःला मोबाईल वापरत नव्हता. तो एखाद्या हॉटेलमधील ग्राहकाचा किंवा ट्रक ड्रायव्हर यांचा फोन वापरायचा. त्यामुळे त्याला पकडायला थोडा उशीर झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## संजय राऊत खोटारड्या माणसांतील हिरो : संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत हे खोटारड्या लोकांतील हिरो आहेत. शिवसेनेतील उठावापासून आजपर्यंत ते एकही वाक्य खरे बोलले नाहीत, अशी टीका सत्ताधारी शिवसेनेचे नेते तथा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केली आहे. यावेळी त्यांनी आदित्य ठाकरे इव्हिनिंग वॉक करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली.

## नागरीकांना विनाकारण त्रस्त करणाऱ्या निष्क्रिय प्रशासक SDM गोरड यांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा



**कन्नड (स्वप्नील राठोड) :** हनुमान मंदिर माळीवाडा कन्नड येथील मुख्य रस्तावर ढापा फुटला आहे.सध्या लग्न सराई सुरू आहे. माळीवाडा, कुंभारवाडा, लहुजीनगर या मुख्य दाटवस्त्या तसेच सावता मंगल कार्यालयाकडे जाणारा हा मुख्य रस्ता आहे. ढापा फुटला असल्याने बाहेरगाव व शहरातील गाड्यात येणाऱ्या लोकांना मनस्ताप होत आहे.हा ढापा तात्काळ दुरूस्त करावा म्हणुन सामाजीक कार्यकर्ते उध्दव पवार व परीसरातील नागरीकांनी प्रशासक गोरड यांना ०८ दिवसा पुर्वी निवेदन दिले होते. तेव्हा प्रशासक गोरड हे मला वरीष्टाला विचारावे लागेल. त्यानंतर पहातो असे बोलले. हा ढापा दुरूस्तीसाठी ३०हजार रूपये खर्च आहे. कायद्या प्रमाणे नप प्रशासकास ५० हजारा पर्यतचे काम निवीदि न मागवता थेट संविदा करून तात्काळ असे काम करता येते.प्रशासका SDM गोरडांच्या हातात कायद्या प्रमाणे तात्काळ काम सुरू करण्याचे अधिकार असताना हे महाशय वर कोणाला विचारणा आहे आणी यांच्या आकाने नाही म्हणाल्यास माळीवाडी,कुभांरवाडा व लहुजीनगर परीसरातील नागरीकांना त्रस्तच ठेवणार का?तरी तुम्ही तात्काळ हा ढापा दुरूस्त करा.पाच दिवसात(२१मे २०२५) बुधवार पर्यत ढापा दुरूस्त करण्या आला नाही तर नगरपालीके विरूध्द परीसरातील नागरीकांनसह जन आंदोलन करण्यात येईल व प्रशासकाचे तोंड काळे करण्यात येईल.मा.नगरसेवक उध्दव पवार व समस्त नागरीक माळीवाडा, कुभांरवाडा,लहुजी नगर कन्नड.



## शैक्षणिक गुणवत्तेसाठी कदमापूर जि. प. शाळेत ई- पोर्टफोलिओ

**खामगाव** : सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाचा दर्जेदार शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रभावी वापर करणे, ही काळाची गरज आहे. हे ओळखून तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा कदमापूर येथील शिक्षक राजेश कोगदे यांनी ई पोर्टफोलिओ हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण प्रक्रिया सुलभ, प्रभावी करण्याविषयी सूचित करण्यात आले आहे. शिक्षण प्रक्रियेत शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचा समन्वय असेल तरच शिक्षण प्रभावी होऊ शकते हे शिक्षण तज्ञांनी सिद्ध केले आहे. हा समन्वय साधण्यासाठी आपण ई पोर्टफोलिओ तयार केला असल्याचे शिक्षक कोगदे म्हणाले.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनात विद्यार्थ्यांची विशेष प्रगती, व्यक्तिमत्व गुणविशेष, सुधारणा आवश्यक, आवड व छंद आणि विशेषता समग्र प्रगती पत्रक लिहिण्यासाठी या पोर्टफोलिओचा उपयोग होऊ शकेल. विविध विषय, खेळ, कला, क्रीडा या विषयीच्या विशेष नोंदी घेण्यासाठी खूप मदत होईल. विशेष म्हणजे विद्यार्थी जर अनुपस्थितीत असेल तर त्या दिवशी अधिकाऱ्यांनी जर शाळेला भेट दिली तर त्या दिवशी अनुपस्थित विद्यार्थ्यांची प्रगती पाहणे शक्य होईल.

आठवड्यातून किमान एका विशेष कृतीची नोंद अशा प्रकारे सर्व विद्यार्थ्यांच्या कृतीची नोंद याद्वारे घेतल्या जाईल. विद्यार्थी वाचन करतो. परंतु त्याचे वाचन कोणत्या प्रकारचे आहे, म्हणजेच अडखळत वाचतो की, अस्खलित वाचतो हे, सुद्धा कळणे सोपे जाईल. विद्यार्थ्यांची प्रगती पालकांना वेळोवेळी कळेल. विद्यार्थी ज्या ठिकाणी बसतो, त्या ठिकाणी एक क्यू आर कोड लावला जाईल आणि विद्यार्थी जर अनुपस्थित असेल आणि त्या दिवशी जर अधिकाऱ्यांनी शाळेला भेट दिली तर त्याची प्रगती पाहणे सुद्धा शक्य होईल. तसेच पालकांना वेळोवेळी आपल्या पाल्याची प्रगती कळणे शक्य होईल.

या क्यू आर कोड प्रमाणे विद्यार्थ्यांना फोटोसह क्यु आर कोड तयार करून देऊन ओळखपत्राच्या एका बाजूला विद्यार्थ्यांची माहिती व दुसऱ्या बाजूला क्यू आर कोड अशी रचना केली आहे.

उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणार हा क्यू आर कोड स्कॅन केला असता संबंधित विद्यार्थ्यांची प्रगती दिसून येते. येत्या शैक्षणिक वर्षापासून आपण या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणार असल्याचे शिक्षक राजेश कोगदे यांनी सांगितले.

## नांदेड, नाशिक, अमरावतीला विजेने घेतले शेतकऱ्यासह चौघांचे बळी



**छत्रपती संभाजीनगर** : मे महिन्याच्या प्रारंभापासून महाराष्ट्रात वादळी वारा, विजेच्या कडकडाटासह आलेला अवकाळी पाऊस बळीही घेत आहे. शुक्रवारी अमरावती, नाशिक, नांदेड येथे वीज पडून शेतकऱ्यासह चौघांचा मृत्यू झाला. अहिल्यानगरात पिकांना जोरदार फटका बसला. शहरासह जिल्ह्यात शुक्रवारी बाराव्या दिवशीदेखील अवकाळी पावसाचा जोर कायम होता. शुक्रवारी शहर व परिसरात दुपारी 40 मिनिटे पावसाने 234 हेक्टर शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. 24 तासांत जिल्ह्यात 5.6 मिमी पावसाची नोंद झाली. येत्या आठवड्यात 14 जिल्ह्यांत पावसाची शक्यता आहे.

पिंपळगावपेठ (ता. सिल्लोड) येथे शुक्रवारी दुपारी सोसाट्याचा वारा सुटल्याने एका लग्न सोहळ्यासाठी उभारलेल्या मंडपाचा काही भाग कोसळला. त्यामुळे बोहल्यावरून नवरदेवाला चक्क कडेवर उचलून घेण्यात आले. सुरक्षित जागी नेऊन विवाह विधी पूर्ण करण्यात आला.

नळवाडी (ता. सिन्नर) येथे रामदास दगडू सहाणे (36) या तरुण शेतकऱ्याचा वादळी पावसात तोल गेल्याने विहिरीत पडून मृत्यू झाला. मापरवाडीत विकास रामनाथ बर्डे (12) या मुलाचा वीज पडून मृत्यू झाला.

धामणगाव रेल्वे तालुक्यातील वसाड शेत शिवारा वीज कोसळून मुन्नाबाई रामदास कवडे (66, रा. वसाड) या महिलेचा घटनास्थळीच मृत्यू झाला. बुलडाण्यात जोरदार पाऊस झाला. वाशिममध्ये शनिवारी पावसाची शक्यता आहे.

शुक्रवारी जालना, बीड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड जिल्ह्यातील काही भागात पाऊस झाला. नायगाव (जि. नांदेड)तालुक्यातील सांगवी गावातील चंद्रकांत सुभाष महागावेचा (26) वीज पडून मृत्यू झाला. तो शेतातून घरी परतत असताना ही घटना घडली. याशिवाय वीज कोसळून संभाजीनगर जिल्ह्यात 6, जालन्यात 4 गुरे दगावली. फुलंब्रीत अद्रक भिजून व्यापाऱ्यांचे नुकसान झाले.

उत्तर प्रदेश, हरियाणा, आसाम, बंगालचा उपसागर तसेच अरबी समुद्रासह देशाच्या अनेक भागात हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. सर्व भागातून येत असलेले आर्द्रतायुक्त वारे आणि दुपारपर्यंत उन्हामुळे निर्माण झालेले बाष्प याच्या संयोगातून राज्यभर अवकाळी पाऊस पडत आहे. अशीच अवस्था कायम राहणार असल्याने राज्यात येत्या आठवड्यात 4 ते 5 दिवस वादळी वारा, विजेच्या कडकडाटासह पाऊस होईल. प्रामुख्याने सिंधुदुर्ग,रत्नागिरी, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, परभणी, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या चौदा जिल्ह्यांत 21, 22 मे रोजी पावसाचा प्रभाव अधिक असेल. म्हणून तेथे ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे, अशी माहिती हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

## तुझी फॅमिली संपवायची आहे; शिंदेंचे आमदार रमेश बोरनारे यांची भाजप कार्यकर्त्याला मारहाण

**वैजापूर** : वैजापूर येथे रस्त्याच्या कामावरून निर्माण झालेल्या वादातून शिवसेना शिंदे गटाचे आमदार रमेश बोरनारे यांनी भाजपच्या कार्यकर्त्याला मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. कैलास पवार असे भाजपच्या कार्यकर्त्याचे नाव आहे. हा प्रकार घडल्यानंतर तक्रार दाखल करण्यासाठी तब्बल तीन तास वैजापूर पोलिस ठाण्यात बसून होतो, तरीही माझी तक्रार स्वीकारण्यात आलेली नाही. पोलिसांकडून केवळ चौकशीचे आश्वासन दिले जात असल्याचे कैलास पवार म्हणाले.

कैलास पवार यांच्या घरासमोरील भागात रस्त्याचे काम सुरू होते. याच ठिकाणी आमदार बोरनारे आणि त्यांच्या सोबत काही कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष बाब म्हणजे रविवारी सुट्टी असूनही नगर परिषदेचे अधिकारी, इंजिनिअर देखील घटनास्थळी आले होते. त्यावेळी आमदार बोरनारे यांनी प्लॉट नंबर ४८ मधून रस्ता काढण्याच्या सूचना दिल्या. मात्र, कैलास पवार यांनी त्या ठिकाणचा 'एन ए' ले-आउट पाहून निर्णय घ्यावा, अशी सूचना दिली. यावरून वाद उफाळला.

कैलास पवार म्हणाले की, आपल्या बंगल्याशेजारी रस्त्याचे काम सुरू होते. त्या ठिकाणी आमदार आणि त्यांचे कार्यकर्ते होते. रविवारी सुट्टी असूनही नगर परिषदेचे अधिकारी त्या ठिकाणी आले होते. त्यावेळी आमदारांनी प्लॉट नंबर ४८ मधून रस्ता काढण्याचे आदेश इंजिनिअरला दिले. त्यावर आपण ले-आऊट बघायला सांगितले. त्या ले-आऊटमध्ये रस्ता नाही. त्यावर आमदार चिडले आणि त्यांनी मला धमकी दिली. तू खूप दिवसांपासून आमच्या डोक्यात आहेस. तुझी फॅमिली संपवायची आहे असे सांगत त्यांनी मला मारहाण केली. आमदारांनी मला जीवे मारण्याची धमकी दिली.

तीन तासांपासून वैजापूर पोलिस स्टेशनमध्ये बसलो असून तक्रार दाखल करुन घेतली नाही. चौकशी करून गुन्हा दाखल करू असे उडवाउडवीचे उत्तर पोलिस देत असल्याचेही कैलास पवार म्हणाले.

दरम्यान, या प्रकरणावर आमदार रमेश बोरनारे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना सर्व आरोप फेटाळून लावले. काही नागरिकांनी माझ्याकडे रस्त्याच्या अडचणीसंदर्भात अर्ज केला होता. त्या अर्जावरून मी नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांना पाहणीसाठी बोलावले. आम्ही नकाशा तपासत असताना कैलास पवार तिथे आले आणि त्यांनी अरेरावीची भाषा केली. त्यामुळे वाद झाला, असे आमदार रमेश बोरनारे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १८ मे २०२५


## पुण्यात मेस व्यवसायाच्या नावाखाली फसवणूक

**पुणे** : भागीदारीत मेस व्यवसायासह इतर व्यवसाय सुरु करुन नफा मिळवू असे आमिष दाखवून एका व्यक्तीने शिवराज मधुकर शिंदे (वय- 28.रा. टेल्को कॉलनी, दत्तनगर, आंबेगाव, पुणे) या तरुणास आमिष दाखवले. त्याला वेगवेगळ्या गोष्टी सांगून विश्वास संपादन करत कॉन्ट्रॅक्ट मिळवून देण्याचे अमिष दाखवून एक कोटी 32 लाख 30 हजार रुपये घेतले. परंतु कोणत्याही प्रकारचे कॉन्ट्रॅक्ट मिळवून न देता तसेच गुंतवणूक पैसे परत न करता सदर रकमेची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे.

याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात राजेश आनंद (वय- 52), पत्नी विणा राजेश आनंद (48), मुलगी चांदणी राजेश आनंद (26), मुलगा वंश राजेश आनंद (23, सर्व रा.कात्रज,पुणे) यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांना आरोपींनी मेस या व्यवसायात 50 टक्के भागीदारी देतो असे सांगितले होते. तसेच इंजिनिअरिंग कॅन्टीन व मेडिकल कॉलेज कॅन्टीन, लाँड्री व्यवसाय व मेडीकल व्यवसाय याकरिता भागीदारी मध्ये पैसे गुंतवण्यास सांगून हॉस्पिटलचे प्रमुख डॉ.संजय ललवाणी यांच्याशी भेट घडवून आणली. तसेच त्यांच्या ऑफिसमधील मामा नावाच्या व्यक्तीशी बोलणे सुरु असल्याचे भासवून वेळोवेळी त्याबाबत सांगून तक्रारदार यांचा विश्वास संपादन करण्यात आला. परंतु कोणत्याही प्रकारचे व्यवसायात भागीदार न देता व कोणतेही कॉन्ट्रॅक्ट मिळवून न देता पळून जाऊन सदर 1 कोटी 32 लाख 30 हजार रुपयांचा अपहार आरोपीने केला आहे. याबाबत पोलिस निरीक्षक एस खिलारे पुढील तपास करत आहे.

गणेश पेठेतील सराफ कारागीर याच्याकडे मोमिन इस्लाम मुल्ला (वय- 36,रा.दारुवाला पुल, पुणे) यांनी 239 ग्रॅम वजनाचे अर्धवट सोन्याचे गंठण आरोपीकडे मणी गोफण्यासाठी विश्वासाने दिले होते. परंतु आरोपीने सदर सोने परत न करता तसेच तक्रारदार व त्याचे भाऊ तसेच सराफ बाजारातील इतर व्यापारी यांचा विश्वासघात करुन 17 लाख 35 हजार रुपयांचे सोने अपहार करुन पसार झाला आहे. याबाबत फरासखाना पोलिस ठाण्यात आरोपी पुर्णा बैद्यनाथ मंडल (वय- 40) याचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वसई विरार महापालिकेच्या अधिकाऱ्याकडे ८ कोटींची कॅश



**मुंबई** : वसई-विरार शहर महानगरपालिकेतील नगररचना विभागाचे उपसंचालक वाय. एस. रेड्डी पुन्हा एकदा प्रचंड भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे चर्चेत आले आहेत. यावेळी त्यांच्या विरोधात थेट कोट्यवधी रुपयांच्या संपत्तीचा खुलासा झाला आहे. याआधी मे २०१६ मध्ये ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत वसई आणि हैदराबाद येथील त्यांच्या घरातून कोट्यवधींचे मालमत्ता सापडली होती. आता तब्बल नऊ वर्षांनंतर पुन्हा एकदा वाय. एस. रेड्डी यांच्या घरातून ८ कोटी ६ लाख रुपयांची रोख रक्कम आणि २३ कोटी २५ लाख रुपयांचे सोनं, हिरे व दागिने मिळाल्याची माहिती समोर आली आहे.

ईडीने हैदराबादमधील त्यांच्या निवासस्थानी छापेमारी करत ही प्रचंड संपत्ती हस्तगत केली आहे. कोविड महामारीच्या पार्श्वभूमीवर २०२० पासून वसई-विरार महापालिकेचा कारभार प्रशासकांच्या हाती आहे. या प्रशासकीय राजवटीत अधिकारी किती बेजबाबदार आणि सत्तेचा गैरवापर करणारे ठरले आहेत, याचे हे मोठे उदाहरण ठरू शकते.

नालासोपारा परिसरातील ४१ अनधिकृत इमारतींच्या घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात सध्या ईडीमार्फत तपास सुरू असून, बुधवारी या प्रकरणात १३ ठिकाणी एकाचवेळी धाडी टाकण्यात आल्या. या कारवाईत संबंधित बिल्डर, दलाल आणि पालिकेचे अधिकारी यांच्या विरोधात पुरावे गोळा करण्यात आले असून, यामध्ये वाय. एस. रेड्डी यांचा समावेश असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यापूर्वी मे २०१६ मध्ये शिवसेनेच्या तत्कालीन नगरसेवकाला २५ लाखांची लाच देताना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रेड्डी यांना रंगेहाथ पकडले होते. त्यावेळी वसईतील वसई विकास सहकारी बँकेतील त्याच्या लॉकरमधून ३४ लाख रुपयांची रोकड आणि दोन किलो सोने जप्त करण्यात आले होते. तसेच, हैदराबाद येथील निवासस्थानातून ९२ लाख रुपये रोख आणि चार किलो सोनं सापडले होते. या कारवाईनंतर रेड्डी यांना निलंबित करण्यात आले होते.

मात्र, धक्कादायक बाब म्हणजे, निलंबनानंतर अवघ्या एका वर्षात, २०१७ मध्ये त्यांना पुन्हा सेवेत बहाल करण्यात आले. आता तब्बल नऊ वर्षांनंतर रेड्डी यांच्या विरोधात पुन्हा मोठा भ्रष्टाचार उघडकीस आला आहे. ईडीच्या छापेमारीत त्याच्या हैदराबाद येथील घरातून ८ कोटी ६ लाखांची रोकड आणि २३ कोटी २५ लाख रुपयांचे सोने, दागिने व हिरे सापडले आहेत.

रेड्डी मूळचे सिडकोचे अधिकारी असून २०१० पासून त्याची वसई-विरार महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आली होती. २०१२ मध्ये पालिकेच्या महासभेच्या मंजुरीनंतर त्याला उपसंचालक (नगररचना) या पदावर नियुक्त करण्यात आले.

या घटनांमुळे प्रशासनात भ्रष्ट अधिकाऱ्यांना संरक्षण देणारी आणि त्यांना पुन्हा सेवेत घेणारी व्यवस्था किती प्रभावी आहे, याचे वास्तव समोर येत आहे. तसेच, अशा प्रकारचे प्रकरणे उघडकीस येणे ही चौकशी यंत्रणांची कार्यक्षमतेची चाचणी ठरत आहे.


**१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी**

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

**DMLT**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

**PGDMLT**
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

**X-RAY**
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी, १२ वी पास

**C.T.SCAN**
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी, १२ वी पास

**E.C.G.**
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी, १२ वी पास

**O.T. TECHNICIAN**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी, १२ वी पास

**PG RADIOLOGY**
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

**रेडिओलॉजी**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

**फिजिओथेरपी**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

**ऑप्थोमेट्री**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

**9405109103 | 8830838903**



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १८ मे २०२५


## मुलींची छेडछाड करणाऱ्यांना विरोध केल्याप्रकरणी तरुणाचे अपहरण करून संशयितांकडून अमानुष मारहाण



**परळी :** परळीमधल्या (जि. बीड) धार्मिक कार्यक्रमात गुंड प्रवृत्तीच्या टोळक्याने मुलींची छेड काढल्याचा गंभीर प्रकार घडला. या गैरवर्तनाला एका तरुणाने विरोध केला. त्यामुळे संतापलेल्या टोळक्याने या तरुणाचे अपहरण करून त्याला अमानुष मारहाण केली असून, या घटनेचा व्हिडिओ तयार केला. तो सोशल मीडियावर व्हायरल झाला असून संपूर्ण जिल्ह्यात संतापाचा उद्रेक झाला आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरण ताजे आहे. त्यानंतरही बीड जिल्ह्यातल्या घटना थांबायला तयार नाहीत.

मिळालेल्या माहितीनुसार, परळी तालुक्यातील जलालपूर गावात अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रम सुरू असताना काही युवकांनी महिलांशी गैरवर्तन करत छेडछाड केली. गावकऱ्यांनी त्यांना तत्काळ कार्यक्रमातून बाहेर काढले. परंतु, याचा राग मनात ठेवून आरोपींनी शिवराज हनुमान दिवटे (रा. परळी, जि. बीड) या तरुणाचे पेट्रोल पंपावरून अपहरण केले आणि त्याला लाठ्याकाठ्यांनी व बेल्टने अमानुषपणे मारहाण केली.

या सर्व घटनेचा व्हिडिओ आरोपींनी स्वतः चित्रीत केला असून तो सोशल मीडियावर व्हायरल करत दहशतीचा प्रयत्न केला. मारहाणीत गंभीर जखमी झालेला शिवराज जीवाची भीक मागत असतानाचा क्षण या व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसून येतो. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात या प्रकरणी समाधान मुंडे आणि इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरीही आरोपी मोकाट फिरत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे.

शुक्रवारी सायंकाळी सुमारे ४ वाजता शिवराज हा सप्ताह कार्यक्रमावरून परतत असताना, परळी येथील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळून त्याचे अपहरण करण्यात आले. त्यानंतर टोकवाडी येथील रत्नेश्वर मंदिर परिसरात नेऊन त्याला लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आली.

या संपूर्ण घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, आरोपी युवकांचे स्थानिक राजकीय नेत्यांशी संबंध असल्याची जोरदार चर्चा आहे. त्यामुळेच पोलिस प्रशासन दबावाखाली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. नागरिकांनी या घटनेच्या सखोल चौकशीची आणि आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या की, बीडचे परळी म्हणजे एक दहशतीचा आता अड्डा झालेला आहे. या विषयाला गंभीरतेने घ्यायला हवे. कारण कालची जी मारहाण झाली त्यातली जी सगळी मुले होती ती अतिशय छोटी आणि १८ वर्षांच्या आसपासची होती. त्यांनी केलेली मारहाण बघून ज्याला मारले त्याला ज्या पद्धतीने पाया पडायला लावले हे सर्व बघून असं वाटतंय की ही रिवेंज केस होती.

अंजली दमानिया म्हणाल्या की, वातावरण आता कुठेतरी भलत्या दिशेने जात आहे. जसे ऑपरेशन सिंदूर पाकच्या सीमेवर केले होते तसेच महाराष्ट्राच्या बीडमध्ये करण्याची गरज आहे, असे मला वाटते. बीडचे परळी हे दहशतीचा अड्डा झालेला आहे, या विषयाला गंभीरतेने घेण्याची गरज आहे.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली यूट्यूबर ज्योतीला अटक



**हिसार :** हरियाणातील यूट्यूबर ज्योती मल्होत्राला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. हिसार पोलिसांनी शनिवारी ज्योतीला न्यायालयात हजर केले, जिथे पोलिसांना 5 दिवसांची रिमांड मिळाली. अटक कधी झाली याची माहिती उघड केलेली नाही. हिसार पोलिसांच्या म्हणण्यानुसार, 'ज्योती पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थांच्या संपर्कात होती. ती सोशल मीडियाद्वारे भारताची गोपनीय माहिती पाठवत होती. ज्योतीने चार वेळा पाकिस्तानला भेट दिली आहे, ज्यामुळे ती भारतीय सुरक्षा एजन्सींच्या देखरेखीखाली होती.

ज्योती पाकिस्तानात क्रिकेट सामना पाहण्यासाठी गेल्यावर सुरक्षा यंत्रणांचा तिच्यावरील संशय अधिकच वाढला. तिथल्या एका मैत्रिणीने ज्योतीच्या प्रवासाचा संपूर्ण खर्च उचलला. याशिवाय, ती भक्तांच्या गटासह तीनदा पाकिस्तानला गेली होती. ज्योतीविरुद्ध हिसार सिव्हिल लाईन्स पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

- ज्योतीचे घर हिसारमधील घोडा फार्म रोडवर आहे. तिचा सोशल मीडियावर एक ट्रॅव्हल ब्लॉग आहे. पूर्वी ती गुरुग्राममध्ये एका खासगी कंपनीत काम करायची, पण कोविड दरम्यान तिला नोकरीवरून काढून टाकण्यात आले. यानंतर ती ब्लॉगर बनली. ज्योतीचे इंस्टाग्राम आणि यूट्यूबवर 'ट्रॅव्हल विथ जो' नावाचे एक चॅनेल आहे.
- मीडिया रिपोर्ट्सनुसार, ज्योती 2023 मध्ये पाकिस्तानला गेली होती. उच्चायुक्तालयातून व्हिसा मिळाल्यानंतर तिने ही यात्रा केली. या काळात ज्योतीची भेट पाकिस्तान उच्चायुक्तालयातील कर्मचारी एहसान-उर-रहीम उर्फ दानिशशी झाली, ज्याच्याशी तिचे घनिष्ठ संबंध निर्माण झाले. दानिशच्या माध्यमातून ज्योतीची ओळख पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या इतर एजंटांशी झाली, ज्यात अली अहसान आणि शाकीर उर्फ राणा शाहबाज (ज्यांचे नाव तिने तिच्या फोनमध्ये 'जट्ट रंधावा' असे सेव्ह केले होते) यांचा समावेश होता.
- अहवालानुसार, ज्योती व्हॉट्सॲप, टेलिग्राम आणि स्नॅपचॅट सारख्या एन्क्रिप्टेड प्लॅटफॉर्मद्वारे या एजंट्सशी संपर्कात राहिली. ती सोशल मीडियावर पाकिस्तानच्या बाजूने सकारात्मक प्रतिमा तर मांडत होतीच, शिवाय संवेदनशील माहितीही शेअर करत होती. दानिश आणि त्याचा सहकारी अली अहसान यांच्यामार्फत ज्योतीची पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्यांशी (पीआयओ) ओळख झाली, ज्यांनी तिच्या पाकिस्तानात प्रवास आणि राहण्याची व्यवस्था केली. त्याने एका पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याशी जवळचे संबंध निर्माण केले आणि अलीकडेच त्याच्यासोबत इंडोनेशियातील बाली बेटावर प्रवास केला.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, एहसान-उर-रहीम उर्फ दानिशला 13 मे 2025 रोजी भारत सरकारने हेरगिरीत सहभागी असल्याच्या आरोपाखाली पर्सना नॉन ग्राटा घोषित केले होते आणि देश सोडण्याचे आदेश देण्यात आले होते. ज्योती यांना सोशल मीडियाद्वारे पाकिस्तानची सकारात्मक प्रतिमा सादर करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. पाकिस्तान त्याचा वापर भारताविरुद्ध प्रचार आणि हेरगिरीसाठी करत होता.

ज्योती मल्होत्राचे वडील हरीश मल्होत्रा म्हणाले - पोलिसांनी सांगितले की ती पाकिस्तानला गेली होती. याआधी व्हिसा इत्यादीही मिळत होते. पासपोर्टही आहे. तरीही, त्यांनी मुलीला पकडून घेऊन गेले. गुरुवारी (15 मे) पोलिस आले. त्यांनी घरातील वस्तूंचीही झडती घेतली. त्यांनी माझा आणि माझ्या भावाचा फोन, लॅपटॉप आणि बँक पासबुकही काढून घेतले. मी ज्योतीला भेटलो, ती म्हणाली की तिला माझ्यात काहीही चूक आढळली नाही. ती जेव्हा एकदा किंवा दोनदा तिथे जायची तेव्हा ती पाकिस्तानातील तिच्या मैत्रिणींशी बोलत असे ज्यांच्या घरी ती राहत असे. ती एका आठवड्यापासून हिसारमध्ये राहत होती.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## हिंगोलीत तिरंगा रॅलीनंतर भाजप आमदाराला भोवळ

**हिंगोली :** हिंगोली येथे भाजपच्या वतीने शनिवारी आयोजित तिरंगा रॅलीनंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना भाजप आमदार तानाजी मुटकुळे यांना भोवळ आली. हा प्रकार इतरांच्या लक्षात आल्यानंतर त्यांना तातडीने उचलून खाली उतरवण्यात आले. त्यानंतर उपचारासाठी एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यामुळे त्यांना भोवळ आल्याचे सांगण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

हिंगोली येथे भाजपच्या वतीने आज सकाळी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी नऊ वाजता महात्मा गांधी चौकातून काढण्यात आलेल्या या रॅलीत राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष गजानन घुगे, आमदार तानाजी मुटकुळे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बी. डी. बांगर, माजी आमदार रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष उज्वला तांभाळे, सुनीता मुळे, कृष्णा रुहाटीया, शाम खंडेलवाल, संजय ढोके यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. भारतीय जवानांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये दाखविलेले शौर्य देशासाठी अभिमानास्पद असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. त्यानंतर तिरंगा रॅलीचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर समारोप करण्यात आला. यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या बाजूला असलेल्या लोखंडी शिडीवरून वर चढले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करताना भाजप आमदार तानाजी मुटकुळे यांना भोवळ आल्याने ते खाली बसले. सदर प्रकार इतरांच्या लक्षात आल्यानंतर त्यांना काही जणांनी हातावर उचलून खाली आणले. त्यानंतर रुग्णवाहिकेद्वारे तातडीने खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु असून रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यामुळे त्यांना भोवळ आल्याचे त्यांच्या निकटवर्तियांनी सांगितले..

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १८ मे २०२५


## जेईएस महाविद्यालय येथे इ. 11वी साठी ऑनलाईन प्रवेशा संदर्भात सहाय्यता केंद्राची स्थापना

**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे)** : जालना शहरात व जिल्ह्यात इयत्ता.११ वी ऑनलाइन कला, वाणिज्य व विज्ञान शाखेसाठी प्रवेश प्रक्रिया दिनांक १९ मे २०२५ पासून सुरू होत असून जेईएस महाविद्यालय जालना येथे ऑनलाइन सहायता केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.जे ई एस महाविद्यालय जालना येथे ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया संदर्भात मोफत मार्गदर्शन व सहाय्यता करण्यात येणार असल्याचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले असून, विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया मोफत सहायता केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. याबाबतच्या अधिक माहितीसाठी उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना यांच्याशी ९४२१६५८००३ या क्रमांकाची संपर्क साधावा.

## सिंदखेड राजा तालुक्यातील पूर्णा नदी च्या पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध्य वाळूचा उपसा



**सिंदखेडराजा (महेश मुंढे)** : याबाबत सविस्तर वृत्त असे की महसूल विभाग सिंदखेडराजा यांनी श्रीमान तहसीलदार अजित दिवटे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली गेल्या काही महिन्यात वाळूमाफियांवर मोठ्या प्रमाणात गाजावाजा करत कार्यवाही केली त्यामुळे असे वाटत होते की यापुढे वाळूमाफियांना चांगलाच वचक बसेल परंतु गेल्या काही दिवसांपासून वाळू वाहतुकीसाठी प्रशासनच मदत करत आहे असे चित्र दिसायला लागले आहे. हिवरखेड पूर्णा, निमगाव वायाळ, दुसरबीड, ताडशिवनी, शेलगाव राऊत, राहेरी व इतर या परिसरातून मोठ्या प्रमाणात अवैध्य वाळू उपसा व चोरटी वाहतूक सुरू आहे. जर तालुक्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात वाळू वाहतूक व उपसा होत असेल आणि पोलीस प्रशासन व महसूल विभाग यांना माहीत होत नाही ही गोष्ट अशक्यच आहे अशी स्थानिक नागरिकांमध्ये चर्चा होत आहे. नंबर नसलेले हायवा ट्रक ने वाळू वाहतूक केली जात आहे त्यावरील वाहक हे देखील विनापरवानाधारक आहेत रात्रीच्या सुमारास भरधाव वेगाने ही वाहने धावतात, यांना पोलीस प्रशासनाचा धाक किंवा भीती राहिलेली नाही किंवा पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादानेच हे सर्व सुरू आहे असे म्हणणे हे चुकीचे ठरणार नाही. सिंदखेडराजा तालुक्यातील किनगाव राजा गावांमधून रस्ता असल्याने सर्व वाळू वाहतूक ही गावातूनच केली जाते, अवैध्य वाळू वाहतूक करणारे विना नंबर असलेले हायवा ट्रक एवढे भरधावं वेगात असतात की अपघात झाल्यास कोणाला जबाबदार धरावे हे समजत नाही. अवैधरीत्या वाळूची मोठ्या प्रमाणात चोरटी वाहतूक करण्यात येत आहे या चोरट्या वाहतुकीकडे संबंधित महसूल विभाग स्थानिक वाहतूक पोलीस प्रशासन दुर्लक्ष करत आहे त्यामुळे वाळू माफियाचे फावत आहे, परिणामी प्रशासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडत आहे. विना क्रमांक भरधाव धावणाऱ्या हायवा ट्रक मधून चोरटी वाळू वाहतूक सुरू आहे त्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मधुर संबंधामुळेच सर्व काही सुरळीत सुरू असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. संबंधित प्रकरणात पोलीस प्रशासन व महसूल विभाग यांनी कुठलेही हित संबंध न ठेवता कठोर कार्यवाही करून जनतेतील गैरसमज दूर करावा.

## संजय निकम यांना रविंद्रनाथ टागोर सन्मान



**मालेगाव** : येथील सुप्रसिध्द राष्ट्रीय कवी लेखक आणि समीक्षक संजय मुकुंदराव निकम यांनी साहित्य संस्कृती आणि सामाजिक क्षेत्रातील दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल बृजलोक साहित्य कला संस्कृती अकादमी फतेहाबाद, आग्रा या संस्थेतर्फे राष्ट्रीय कवी संजय मुकुंदराव निकम यांना रवींद्रनाथ टागोर सन्मान देऊन गौरविण्यात आले., संस्थेचे अध्यक्ष मुकेश कुमार वर्मा यांच्या हस्ते राष्ट्रीय कवी लेखक आणि समीक्षक संजय मुकुंदराव निकम मालेगाव यांचा विशेष सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास अभिषेक कुमार, सुनील पांडे,अशोक पटनी, अर्चना श्रेया, डॉ जसप्रीत कौर फलक,रश्मि अरोड़ाआदी साहित्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.तसेच आग्रा येथील सर्व स्तरातील नागरिक आणि रसिक श्रोते कार्यक्रमास उपस्थित होते.जसप्रीत कौर फलक यानी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. रश्मी अरोड़ा यांनी उपस्थितांचे आभार मानले.हा कार्यक्रम आग्रा येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १८ मे २०२५


## मोहन भागवत म्हणाले - दुर्व्यवहार करण्याचे धाडस केल्यास भारत धडा शिकवेल



**जयपूर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख डॉ. मोहन भागवत यांनी शनिवारी सांगितले की, भारत कोणाशीही वैरभाव ठेवत नाही, परंतु जर कोणी काही करण्याचे धाडस केले तर ते त्याला धडा शिकवण्यापासून मागे हटणार नाही.

तो म्हणाला- जेव्हा तुमच्याकडे सत्ता असते तेव्हाच जग प्रेम आणि आनंदाची भाषा ऐकते. हे जगाचे स्वरूप आहे, ते बदलता येत नाही. म्हणून, जगाच्या कल्याणासाठी आपल्याला शक्तिशाली असण्याची आवश्यकता आहे.

जयपूरमधील सिकर रोडवरील रविनाथ आश्रमात रविनाथ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. भागवत बोलत होते.

ते म्हणाले- लोक कदाचित विचार करत असतील की मी रविदास आश्रमात का आलो आहे. हे देखील वाजवी आहे. पण मी रविदासजींचा भक्त आहे, त्यांच्यामुळेच मी आश्रमात आलो आहे.

मोहन भागवत यांनी आश्रमातील भाषणाची सुरुवात 'मै भारत का रहने वाला हूँ, भारत की बात सुनाता हूँ' या शब्दाने केली. भारत हा जगातील सर्वात जुना देश असल्याचे वर्णन करताना त्यांनी त्यांची भूमिका मोठ्या भावासारखी असल्याचे वर्णन केले. ते म्हणाले- भारत जगात शांतता आणि सौहार्दासाठी काम करत आहे. भारत सर्व क्षेत्रात प्रगती करेल. भारताचे कोणाशीही शत्रुत्व नाही, पण जर कोणी तसे करण्याचे धाडस केले तर ते धडा शिकवण्यास मागेपुढे पाहत नाही.

ते म्हणाले- भारत ज्या इतर राष्ट्रांना मदत करतो, ते कधीकधी विरुद्ध प्रवाहात वाहतात, तरीही आम्ही मदत करतो. कारण आपल्या मनात सहकार्याची भावना असते. आपण अनेक देशांचे मोठे भाऊ आहोत, पण आपण मोठे भाऊ असल्याचा अभिमान बाळगू नये. त्याऐवजी, मोठ्या भावाचे कर्तव्य बजावताना, धाकट्या भावांना योग्य सल्ला द्यावा लागतो.

ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख न करता भागवत म्हणाले की, दुर्बल काहीही करू शकत नाहीत. आपल्याला जगाला आपली ताकद दाखवायची आहे. आम्ही प्रत्येकाशी त्यांच्या आवडीनुसार वागतो. कधीकधी परिस्थिती आपल्या विरोधात असते, पण तरीही आपण मदत करतो. जगाने आपली ताकद पाहिली आहे.

संघप्रमुख म्हणाले - भारतात त्यागाची परंपरा आहे. आम्ही भगवान श्री रामापासून भामाशाहपर्यंत सर्वांची पूजा आणि आदर करतो. विश्व कल्याण हा आपला धर्म आहे. विशेषतः हिंदू धर्मात हे एक कठोर कर्तव्य आहे. ही आपली ऋषी परंपरा आहे, जी संत समुदाय पुढे नेत आहे.

भागवत म्हणाले- संपूर्ण जगात प्रत्येकजण एक आहे. प्राचीन काळापासून महात्मा एकत्र राहण्याचा संदेश देत आले आहेत. साधू आणि संत पूर्णपणे भारलेले असतात, आपण भारित झाल्यानंतर महात्मांसारखे होतो. प्रत्येकाने अशा ठिकाणी जावे जिथे संत असतात. मुलांना संतांच्या सान्निध्यात जाण्यासाठी संस्कार द्या.

## शिवाजी गायकवाड यांना सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान




**छत्रपती संभाजीनगर :** विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक क्रीडा अध्यात्म संत सेवा यात निष्ठेने कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. *यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे भव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होतेया कार्यक्रमाचे उदघाटक विधान परिषदेचे नूतन आमदार संजय केणेकर यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी एस.पी. जवळकर (ज्येष्ठ शिक्षण तज्ञ , तथा आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मार्गदर्शक व विचारवंत) होते तर मुख्य अतिथीमनिषा ताई भन्साळी (शहर उपाध्यक्ष भाजपा , तथा उद्योजक छत्रपती संभाजीनगर या होत्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव संतोष अण्णा सुरडकर यांनी केले तर अतिथींचे स्वागत मयूर सुरडकर यांनी केले**राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याकरता महाराष्ट्रभराच्या विविध भागातून आलेल्या गुणवंताचा गौरव हा पुरस्कार श्री श्री 1008 महामंडलेश्वर स्वामी शनिभक्त सुखदेवजी महाराज, वाकी,महंत श्री श्री 1008 अक्काताई महाराज ,श्रीनाथ आश्रम वेरूळ,श्री महंत स्वामी भरतगिरीजी महाराज (बाबाजी) (श्री धारेश्वर प्रतिष्ठान, धामणगाव गोमुखी)ह.भ.प. रामकृष्ण अकोलकर महाराज संतपीठ पैठण महेंद्र कुमारजी संकलेचा (जेष्ठ साहित्यक)संजय मंत्री (अध्यक्ष - राजस्थान प्रकोष्ठ भाजपा) केदारजी पालोदकर (मॅनेजर - रॅडिको डिस्लरीज)अवघडपीर महंत संघर्षनाथजीयोगी निरंजननाथ महाराज चैतन्य महाकाली मंदिर मठाधिश्वर, दौलताबाद श्री श्री 1008 महामंडलेश्वर डॉ. शिवलक्ष्मी आईसाहेब ह.भ.प. संतोषजी महाराज गोंशीकर ह.भ.प. मयुरी दीदी संजय डोबळे महाराज राजेशजी मेहता(शहर सचिव भाजपा)राजेशजी पगारिया(उद्योजक),उद्योजिका लक्ष्मीताई महाकाठ (बालाजी & हरिओम इंडस्ट्रीज) यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला* *याप्रसंगी प्रमुख पाहुणे - शेखर भैय्या मस्के (उद्योजक)अॅड. ज्योती थोरात (धर्मादाय कार्यालय). राजेश वाघ (पी.एस.आय. वाळूज पोलीस स्टेशन) बबन दिंडोरे पाटील (संस्थापक नवीन औरंगाबाद गणेश उत्सव समिती)लता जाधव (दामिनी पथक)अॅड. श्रीकांतजी मिश्रा (धर्मादाय कार्यालय) भिवसन वाघपोलीस निरक्षक सेवा निवृत्तकिशोर दुग्गडमेशजी मेहता (उद्योजक) प्रसिद्ध गायक संगीतकार प्रा. जगदीशजी वेदपाठक (मराठवाडा म्युझिक सर्कल, रिसर्च फाउंडेशन ),निलेशजी अग्रवाल मित्तल (सचिव राजस्थान प्रकोष्ठ भाजपा शिवाजी काळे से.नि. उपायुक्त पशू सवर्धनडॉ. संजय वाघ स्वच्छ भारत मिशन (जिल्हा परिषद छ. संभाजीनगर)श्री संतोष पाटील चेपूरवार नरसिम्हा प्लेसमेंट प्रा. लिमिटेडसाईनाथ धोंडीराम हजारे (मराठवाडा अध्यक्ष) महाराष्ट्र राज्य परीट धोबी सेवा मंडळ, संत गाडगेबाबा प्रतिष्ठान छ. संभाजीनगरकिशोरचंद मणिकचंद दुग्गडरमेशशेठ मेहता*प्रियंका दिनेश मुथा ( जितो जिल्हा अध्यक्ष)अध्यक्षा गणेश बावकर सेवा निवृत्त अधिकारी जिल्हा परिषद राजेश चंदनमल पगारीया जिल्हा अध्यक्ष अखिल भारतीय जैन संघटना डॉ. अशोक कोठारी रविंद्रजी जैनडायरेक्टर निओन सिटी (सहारा सिटी) शंकर अण्णा म्हात्रे पा.(भाजपा) संतोष पाटील चेपूरवार आदींची उपस्थिती होती*सर्व उपस्थित आमचे आभार गणेश फन्टे यांनी व्यक्त केले आभार प्रदर्शन अनिल काथार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समस्त संचालक मंडळ, समग्र सोशल फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर चे सर्व पदाधिकारी यांनी प्रयत्न केले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002